# कोकण भूमी प्रतिष्ठान

## समृध्द कोकण अभियान

KOKAN BHUMI PRATISHTHAN

समृध्द कोकण



## कार्यकारिणी

**द. म. सुकथनकर**
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
संस्थापक मार्गदर्शक, कोकण भूमी प्रतिष्ठान

**डॉ. राजेंद्रसिंह**
रॅमन मॅगसेसे व
स्टॉक होम वॉटर प्राईझ विजेते
मार्गदर्शक, कोकण भूमी प्रतिष्ठान

**अरुण बोंगिरवार**
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
संस्थापक मार्गदर्शक, कोकण भूमी प्रतिष्ठान

**संजय यादवराव**
प्रमुख कार्यवाहक, कोकण भूमी प्रतिष्ठान
प्रमुख कार्यवाहक, ग्लोबल कोकण
अध्यक्ष, समृध्द कोकण
प्रमुख कार्यवाहक, कोकण पर्यटन उद्योग संघ

## प्रमुख मार्गदर्शक

**देवेंद्रजी फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**नितीनजी गडकरी**
रस्ते व व वाहतूकमंत्री, भारत सरकार

**शरदचंद्रजी पवार**
माजी कृषीमंत्री, भारत सरकार

**पृथ्वीराजजी चव्हाण**
माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**विनोदजी तावडे**
शालेय शिक्षणमंत्री
महाराष्ट्र राज्य

**सुभाषजी देसाई**
उद्योगमंत्री
महाराष्ट्र राज्य

**रविंद्रजी चव्हाण**
बंदरे व वैद्यकिय शिक्षणमंत्री
महाराष्ट्र राज्य

**अजितदादा पवार**
माजी उपमुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

**गणेशजी नाईक**
माजी उप्तादन शुल्कमंत्री
महाराष्ट्र राज्य

## मुख्य कार्यकारिणी

**आशिषजी शेलार**, आमदार
स्वागताध्यक्ष, ग्लोबल कोकण
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, मुंबई

**भाई जगताप**, आमदार
कार्याध्यक्ष, ग्लोबल कोकण

**राजीव पाटील**
प्रथम महापौर, वसई-विरार

**माधव भांडारी**
प्रवक्ते, भाजपा

**सुनिलजी प्रभू**
आमदार

**प्रशांतजी ठाकूर**
आमदार

**जगन्नाथजी शिंदे**
आमदार

**प्रसाद लाड**
उद्योजक

**संजीवजी नाईक**
माजी खासदार

**प्रमोदजी जठार**
संचालक

**किशोरभाई धारिया**
अध्यक्ष, हिरवळ

**रविंद्र प्रभूदेसाई**
अध्यक्ष, पितांबरी

**राजेंद्र सावंत**
अध्यक्ष, निर्माण ग्रुप

**अजित मराठे**
संचालक

**अनंत भालेकर**
संचालक

**मनोहर सकपाळ**
संचालक

**अनिल आयरे**
संचालक

**गणेश यादव**
संचालक

## उद्योजक मार्गदर्शक

**हसन चौगुले**
उद्योजक, कतार

**शेखर निकम**
कार्याध्यक्ष
सह्याद्री शिक्षण संस्था

**इंद्रजित सावंत**
उद्योजक

**जगन्नाथ मोरे**
उद्योजक

**पप्पुशेठ पाटील**
उद्योजक

**श्रीराम दांडेकर**
उद्योजक

**शशांक सांडू**
उद्योजक

**दिलीप बाईंग**
उद्योजक

**डॉ. झहीर काझी**
चेअरमन, अंजुमन इस्लाम

**ॲड. हर्षद भडबडे**
संचालक

**दिपक परब**
उद्योजक

**श्रीकांत सावे**
उद्योजक

**प्रदिप शिर्के**
अध्यक्ष, कोकण सृष्टी डेव्हलपर्स

**ललित महाडेश्वर**
उद्योजक, U.S.A.

**नितीन नेरुळकर**
चेअरमन, मांगरीश ग्रुप

**शशिकांत पेडणेकर**
चेंअरमन, न्यू मॅक्स ग्रुप

**प्रसाद कोळंबकर**
अध्यक्ष, एक्झोटिका

**प्रकाश तांबोस्कर**
उद्योजक

**संजय खानविलकर**
उद्योजक

**प्रमोद भोसले**
उद्योजक

**रविकिरण जाधव**
उद्योजक

**प्रमोद पवार**
अभिनेता

# परिषदा व अभ्यासदौरा


जल परिषद, मुंबई


कोकण विकास मेळावा, बोरीवली


हापूस आंबा लागवड परिषद


ग्लोबल कोकण पर्यटन परिषद


सिंधुदूर्ग कृषी पर्यटन विकास परिषद - वेंगुर्ला


आधुनिक शेती परिषद, मुंबई


पर्यटन व्हिजन २०२० परिषद


सामुदायिक शेती


केळी / हळद / नगदी पिके लागवड प्रशिक्षण शिबीर


अभ्यासदौरा


३ दिवसीय प्रशिक्षण वर्ग


अभ्यासदौरा

# कोकण व्हिजन २०२०



कोकण व्हिजन २०२०,दापोली - २८ ऑक्टोबर २००७



कोकण व्हिजन २०२० एलफिस्टन परेल, मुंबई : १० ते १९ मे २००८



कोकण व्हिजन २०२० एलफिस्टन परेल, मुंबई : १० ते १९ मे २००८



कोकण व्हिजन २०२०,दापोली - २८ ऑक्टोबर २००७



कोकण व्हिजन २०२०, भांडूप



कोकण विकास यात्रा - डहाणू ते वेंगुर्ला : १४ ते १८ ऑगस्ट २००९



ॲडव्हान्टेज कोकण, मुंबई - १८ एप्रिल २०१०



ॲडव्हान्टेज कोकण, मुंबई - १८ एप्रिल २०१०



ॲडव्हान्टेज कोकण - मुंबई



कोकण व्हिजन २०२०, भांडूप



कोकण विकास यात्रा - डहाणू ते वेंगुर्ला : १४ ते १८ ऑगस्ट २००९

## कोकण भूमी प्रतिष्ठान - समृध्द कोकण अभियान

देशाचा सर्वात समृध्द प्रदेश म्हणजे कोकण. ७०० किमीचा समुद्र किनारा तितकाच मोठा सह्याद्री यामध्ये वसलेली ही परशुरामाची पवित्र भूमी. परमेश्वराने कोकणाला सर्व काही दिले आहे. नितांत सुंदर समुद्र किनारे, खळाळणाऱ्या नद्या, बॅकवाटर, जंगल, भरपूर जैवविविधता, वन्यजीवन, ५००० वर्षाचा इतिहास, समृध्द लोकसंस्कृती, ग्रामीण जीवन, खाद्यसंस्कृती, पुरातन मंदिरे, किल्ले, जलदुर्ग भारताची सर्व रुपे कोकण प्रदेशात पाहायला मिळतात.

श्रीमंत कृषी उत्पादन हापूस आंबा, काजू, मत्स्यसंपत्ती, मसाला पिके, खनिज संपत्ती, निसर्गाची सर्व श्रीमंती कोकणात असून देखील कोकण हा मागासलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो. या सर्व साधन संपत्तीचे नीट नियोजन केले, विकासाची दिशा निश्चित केली, सर्व कर्तृत्ववान कोकणवासीय संघटीत झाले, तर देशातीलच नव्हे, जगातील एका समृध्द प्रदेशाची निर्मिती होऊ शकेल. याच ध्येयाने कोकण भूमी प्रतिष्ठानचे काम सुरु झाले आहे.

**२००२ साली संस्थेची स्थापना झाली. २६-३-२००८ साली संघटना रजिस्टर झाली.**

गेली १५ वर्षे डहाणूपासून वेंगुर्ल्यापर्यंत व जव्हारपासून दोडामार्गपर्यंत सर्व कोकणवासियांना संघटीत करण्याचे काम कोकण भूमी प्रतिष्ठान करत आहे. जात-पात, पंथ-भेद-पक्ष, जिल्हा तालुका हे सर्व विसरुन सर्व कर्तृत्ववान कोकणवासियांनी एकत्र यावे व कोकण विकासासाठी प्रत्यक्ष कृती करावी, एकमेकांना सहकार्य करुन आपला स्वतःचा, गावाचा, तालुक्याचा, जिल्हयाचा पर्यायाने कोकणाचा विकास करावा. याकरिता संघटीत अभियान सुरु झाले आहे. कोकणातील गावागावांत कृषी, फलोद्यान, फळप्रक्रिया, पर्यटन, ग्रामीण पर्यटन, मत्स्यशेती असे हजारो प्रकल्प उभे रहावेत व यातून लाखो तरुणांना कोकणातच रोजगार मिळावा. संपूर्ण कोकण मनिऑर्डर मुक्त व्हावा याकरिता एक संघटीत अभियान प्रतिष्ठान चालवत आहे. यासाठी कोकण व्हिजन परिषदा, कार्यशाळा, प्रशिक्षण शिबिरे, अभ्यासदौरा, आदि कार्यक्रम करतो.

**कोकणातील कर्तृत्ववान व्यक्तींना तरुणांना एकाच व्यासपिठावर आणून निसर्ग समृध्द कोकणाला आर्थिक समृध्द करण्यासाठी सुरु झालेली चळवळ म्हणजेच कोकण भूमी प्रतिष्ठान (समृध्द कोकण अभियान)**

मागील १० वर्षात कोकण विकासाची प्रक्रिया वेगाने सुरु झाली. भारताची आर्थिक राजधानी कोकणात आहे. शिवडी-न्हावा सी लिंक, मुंबई-गोवा चौपदरीकरण आणि नॅशनल हायवे ६६ म्हणून मान्यता, पनवेल, रत्नागिरी-चिपी, एअरपोर्ट, पर्यटनाचा महामार्ग कोस्टल हायवे, मुंबई - अलिबाग - वेंगुर्ला, जलवाहतूक, कोकण रेल्वेचे दुपदरीकरण यामुळे संपूर्ण कोकण मुंबईशी व जगाशी वेगाने जोडले जाणार आहे. तज्ज्ञांच्या मते पुढील ५० वर्ष कोकणची आहेत. या विकासाच्या प्रक्रियेत स्थानिक कोकणवासीय भूमीपुत्रांनी सहभागी व्हावे. याकरिता समृध्द कोकणचे अभियान सुरु झाले आहे.

कोकण भूमी प्रतिष्ठान हे कोकणच्या सर्वांगीण विकासाचे संघटीत अभियान व लोकचळवळ आहे. निसर्ग समृध्द कोकणला आर्थिक समृध्द करण्यासाठी विविध उपक्रम या चळवळीच्या माध्यमातून आम्ही राबवित आहोत. पर्यटन, कृषी व ग्रामीण पर्यटन, आधुनिक शेती, हापूस आंबा, फलोद्यान, फळप्रक्रिया, मत्स्योद्योग, वनौषधी, वनसंपत्ती कोकणातील समृध्द साधन संपत्तीचा उपयोग करून पर्यावरणपूरक असंख्य स्वयंरोजगाराचे प्रकल्प कोकणात गेल्या १० वर्षात या चळवळीच्या माध्यमातून सुरु झाले आहेत. कोकण व्हिजन-२०२५ हा कोकण विकासाचा आराखडा प्रतिष्ठानने तयार केला आहे. पुढील १०-१५ वर्षात विविध विषयात कोकणचा विकास कशा प्रकारे करता येईल याचा विकास आराखडा तज्ज्ञांच्या मदतीने तयार झाला आहे. मुंबईतील **'ग्लोबल कोकण'** हा आंतरराष्ट्रीय महोत्सव, कोकण व्हिजन २०२० परिषदा, विविध संमेलने, प्रशिक्षण शिबिरे, अभ्यासदौरे या माध्यमातून कोकणवासियांची मानसिकता बदलणे आणि प्रत्यक्ष प्रकल्प उभारण्यासाठी उद्युक्त करणे, असे उपक्रम आम्ही राबवित आहोत.

**कोकण भूमीच्या कार्याला काही मान्यवरांचे विशेष पाठबळ लाभले, या मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे संघटना मजबूत बनली.**

## समृध्द कोकण अभियान - उद्योजक प्रतिष्ठान

**समृध्द कोकण - कर्तृत्ववान कोकणवासियांचे व्यासपीठ :-** U.S.A पासून ऑस्ट्रेलियापर्यंत, मुंबई-पुणे, डहाणू ते वेंगुर्ला येथील सर्व कर्तृत्ववान कोकणवासियांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी व त्यांच्या सहकार्याने कोकणात हजारो प्रकल्प उभारण्यासाठी, समृध्द कोकण अभियानाची सुरुवात झाली आहे. कोकणातील चारही जिल्हयात कृषी, फलोत्पादन, फळप्रक्रिया, उद्योग तसेच सामाजिक काम करणारे अनेक मान्यवर कोकणवासीय समृध्द कोकणचे सदस्य आहेत. सध्या कोकण क्लबचे ५००० हून अधिक सदस्य आहेत. कोकणवासियांनी कोकणातील आपल्या जमिनी विकू नयेत. त्यांचा विकास करावा, प्रकल्प उभारावेत. याकरिता व्यापक जनजागृती अभियान आम्ही चालवत आहोत. समृध्द कोकणच्या माध्यमातून खालील उपक्रम / कार्यक्रम आयोजित केले जातात.

**मार्गदर्शनपर परिषदा :-** यामध्ये कृषी, फलोत्पादन, फळप्रक्रिया, पर्यटन, कृषी पर्यटन, उद्योग, वनौषधी यांसारख्या विविध मार्गदर्शनपर परिषदांचे आयोजन तज्ज्ञांच्या उपस्थितीत दरमहा केले जाते. **याअंतर्गत आयोजित केलेल्या काही प्रमुख परिषदा पुढीलप्रमाणे**

**सामुदायिक शेती आणि कृषी पर्यटन - पालघर (५ ऑगस्ट २०१२ : उपस्थिती -८००), ग्लोबल कोकण पर्यटन परिषद - टिप टॉप प्लाझा, ठाणे ( ३ डिसेंबर २०१२ : उपस्थिती - ८००), कृषी पर्यटन परिषद - वीर सावरकर सभागृह,मुंबई (६ मार्च २०१३ : उपस्थिती - ४००), हापूस आंबा लागवड परिषद - वीर सावरकर सभागृह, मुंबई (१२ एप्रिल २०१३ : उपस्थिती - ५००), आंबा परिषद, पर्यटन व्हिजन २०१६ (२० सप्टेंबर २०१६ - उपस्थिती ७००)**

**परिषदा व प्रशिक्षण कार्यक्रम :-** कोकण विकासाच्या विविध विषयांवर (कृषी, फलोत्पादन, फळप्रक्रिया, पर्यटन, कृषी पर्यटन, वनौषधी ) प्रशिक्षण कार्यक्रमांचे व परिषदांचे आयोजन कोकणातील ५ ही जिल्हयात केले. परिषदांमधून कोकण विकासाच्या विषयाचे मार्गदर्शन करुन माहिती दिली जाते. जमिनी न विकता प्रकल्प सुरु करण्याची मानसिकता तयार केली जाते.

- **प्रशिक्षणात १५ वर्षात २५ ,००० हून अधिक कोकणवासियांचा सहभाग**

**अभ्यासदौरा :-** गेली १५ वर्षे सातत्याने दरमहा कोकणातील कृषी प्रकल्पांचा अभ्यासदौरा आयोजित केला जातो. प्रत्यक्ष प्रकल्पावर लागवडीची प्रात्यक्षिकासह माहिती दिली जाते. मार्गदर्शन करण्यात येते, प्रत्यक्ष प्रकल्प बघता येतो. कोकणवासियांना प्रकल्प उभारणीसाठी प्रेरणा देणे, अशा स्वरुपाचे प्रकल्प गावागावात सुरु व्हावेत हा अभ्यासदौरा आयोजनाचा उद्देश आहे.

- **आतापर्यंत ३००० कोकणवासीयांचा अभ्यासदौऱ्यात सहभाग**
- **५०० हून अधिक प्रकल्प सुरु**

**सामुदायिक शेती :-** कोकण भूमी प्रतिष्ठानचे कृषी विभाग प्रमुख कृषीभूषण स्वर्गीय रणजितराव खानविलकर यांच्या पुढाकाराने चिपळूण (पेंढाबे) येथे सामुदायिक केळी लागवड प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली. यामधून प्रेरणा घेऊन सामुदायिक शेतीचे प्रयत्न सुरु झाले. तुकड्या तुकड्या जमिनीमध्ये मालकी हक्क कायम ठेवून जमिनीवर एकत्र लागवड करण्यात येते. या उपक्रमामुळे पडिक जमिनी लागवडीखाली आल्या.

- **१००० एकरवर सामुदायिक शेती प्रकल्प सुरु**
- **मागील ५ वर्षात १० कोटीहून अधिक आर्थिक उत्पन्न**

**आंबा विकास :-** कृषी विभागाच्या वतीने आंबा तज्ज्ञ श्री. विजय जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आंबा विकासाची चळवळ सुरु करण्यात आली. यामुळे कोकणात आंब्याचे एकरी उत्पादन ३ ते ५ पट वाढविता आले. आधुनिक तंत्रज्ञानाने आंब्याच्या व्यवस्थापनातून कोकणातील आंबा उत्पादक एकरी १ ते ३ लाख रु. उत्पन्न मिळवू शकला. या तंत्रज्ञानामुळे दरवर्षी हमखास आंबा येतो. बागायतदारांना खात्रीशीर उत्पन्न मिळाल्याने त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

- **१०० पेक्षा जास्त बागांचे व्यवस्थापन सुरु.**
- **कमी उत्पादन खर्चाच्या रॅपलिंग चेंबरची निर्मिती सुरु**

## कोकण व्हिजन २०२०

कोकण भूमी प्रतिष्ठानने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव **मा. द.म.सुकथनकर** यांच्या अध्यक्षतेखाली कोकण व्हिजन २०२० परिषदांचे आयोजन केले होते. या परिषदेत कोकण विकासात महत्त्वाच्या ठरणाऱ्या फलोद्यान, फळप्रक्रिया, कृषी, मत्स्य संवर्धन आणि प्रक्रिया प्रशिक्षण, उद्योग आणि पर्यटन या विषयावर सांगोपांग चर्चा करण्यात येते.

| क्र. | परिषद | दिनांक | स्थळ | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | कोकण व्हिजन २०२० | २८ ऑक्टोबर २००७ | दापोली | १००० |
| २. | कोकण व्हिजन २०२० | १८ एप्रिल २००९ | नरिमन पॉईंट, मुंबई | ८०० |
| ३. | कोकण व्हिजन २०२० | १० ते १९ मे २००८ | एलफिन्स्टन रोड, मुंबई | २०००० |
| ४. | ॲडव्हान्टेज कोकण परिषद | ०२ डिसेंबर २०१२ | टिप टॉप प्लाझा, ठाणे | १२०० |

या परिषदेत व्यक्त झालेल्या विचारांचा आणि विविध क्षेत्रातील १०० हून अधिक तज्ज्ञांच्या मदतीने कोकण व्हिजन आराखडा प्रतिष्ठानने तयार केला. या आराखड्यात एकूण ३५ महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. या मागण्यांचा आराखडा कोकणातील सर्व लोकप्रतिनिधी व शासनाला सुपूर्द केला आहे. या मागण्यांचा वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला.

**कोकण विकासाचा आराखडा बनवून न थांबता, कोकण विकास समितीला सादर केला. समतोल प्रादेशिक विकासासाठी शासनाने माजी केंद्रीय अर्थसचिव डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समतोल प्रादेशिक विकास समिती स्थापन केली. या समितीसमोर कोकण विकासाचा आराखडा ठेवताना कोकण प्रदेशाला उर्वरीत महाराष्ट्राचे नियम न लावता स्वतंत्र वैद्यानिक विकास मंडळ सत्वर स्थापन करावे, ही मागणी करण्यात आली. कोकण प्रदेशाची बलस्थाने, विकासाच्या संधी, त्यासाठी आवश्यक साधने व सुविधा, संधी, साध्य करताना पाळावयाची पथ्ये यांचा उहापोह करण्यात आला.**

**पायाभूत सुविधा, बंदर विकास, पर्यटन या त्रिसूत्रीला प्राधान्य देण्याची सूचना करण्यात आली.**

## कोकण भूमी प्रतिष्ठानने शासनाकडे वेळोवेळी केलेल्या मागण्यांपैकी मान्य झालेल्या मागण्या

- मुंबई - गोवा महामार्गाचे चौपदरीकरण काम सुरु, १८ हजार कोटी मंजूर.
- कोकण - सागरी मार्गाला महामार्गाचा दर्जा.
- मुंबई - गोवा जलवाहतुकीचे सर्वेक्षण पूर्ण, लवकरच जल वाहतुकीला सुरुवात.
- कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणाला १० हजार कोटी रुपये मंजूर, काम सुरु.
- मुख्य मार्गापासून बंदरे व पर्यटन स्थळाला जोडणाऱ्या रस्त्यासाठी १८६०० कोटी मंजूर.
- ग्रामीण पर्यटनासाठी ५० गावांचा आराखडा सादर. त्यापैकी २५ गावांची निवड, दरवर्षी ५० कोटीची योजना मंजूर.
- मरिन युनिव्हर्सिटी मंजूर, जागा उपलब्धतेची पाहणी सुरु.
- नवीन बंदर बांधणी व जुन्या बंदरांचा विकास
- कोकण जलपरिक्रमा अंतर्गत निवडण्यात आलेल्या गांधारी, जगबुडी, अर्जुना आणि जानवली या ४ नद्यांचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याच्या मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या आदेशानुसार आराखडा तयार.

# ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव

ग्लोबल कोकण महोत्सव :-

विविध कार्यक्रमातून कोकण पर्यटनाची देशव्यापी प्रसिध्दी केल्यानंतर कोकणातील निसर्ग, पर्यटन स्थळे, संस्कृती, लोककला, खाद्यपदार्थ यांना जागतिक व्यासपीठ मिळावे म्हणून 'ग्लोबल कोकण' हे अभियान आम्ही सुरु केले आहे. या महोत्सवात १०० कोटीची उलाढाल होते. ग्लोबल कोकणची वैशिष्टये खालीलप्रमाणे :

- ग्लोबल कोकण महोत्सव' हा आंतरराष्ट्रीय महोत्सव गेली पाच वर्षे प्रतिष्ठानने आयोजित केला.
- मुंबईतील हा सर्वात मोठा आंतरराष्ट्रीय महोत्सव.
- पहिल्याच वर्षी ३ कि.मी. रांग.
- दरवर्षी ४० कोटींची उलाढाल.
- अप्रत्यक्ष ६० कोटींची उलाढाल.
- ३५० पेक्षा जास्त स्टॉल उभारणी.
- महाराष्ट्र शासनाचा सहभाग
- महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ आणि पर्यटन विभागाचा सहभाग.
- देशी - परदेशी टूर ऑपरेटर्स, पर्यटन व्यावसायिकांना व्यासपीठ.
- देशी - परदेशी टूर ऑपरेटर्स व कोकणातील पर्यटन व्यावसायिकांचे थेट भेट / चर्चा
- परदेशी पर्यटकांचा सहभाग.
- छोट्या उद्योजकांना विक्रीसाठी व्यासपीठ
- नवीन उत्पादनांना विक्री संधी
- अप्रसिध्द पर्यटन स्थळांना प्रसिध्दी
- कृषी - ग्रामीण पर्यटन केंद्र चालकांना स्वतःच्या व्यवसाय प्रसिध्दीची संधी.

महोत्सव स्थळ :-

- प्रथम वर्ष २०११ : बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई
- व्दितीय वर्ष २०१२ : बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई
- तृतीय वर्ष २०१३ : नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई
- चतुर्थ वर्ष २०१३-१४ : सिडको मैदान, सानपाडा, वाशी
- पाचवे वर्ष २०१५ : नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई

महोत्सवाची दालने :-

- **पर्यटन दालने** (महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ पुरस्कृत) :- पर्यटन व्यावसायिक, हॉटेलियन, टूर व्यावसायिक, कृषी - ग्रामीण पर्यटन केंद्र धारक यांचा समावेश
- **विशेष पर्यटन गॅलरी** कोकणातील पर्यटन स्थळांची छायाचित्रे, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय छायाचित्रकारांबरोबर हौशी छायाचित्रकारांच्या फोटोचे प्रदर्शन.
- **आर्ट गॅलरी :-** कोकणातील कलाकारांना व्यासपीठ मिळावे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवलेल्या कोकणातील कलाकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शन.

# ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव





























# ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव
































# कोकण ग्लोबल : कोकणची आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी


हापूस महोत्सव (लंडन)


हापूस महोत्सव (लंडन)


WTM लंडन पर्यटन प्रदर्शनात सहभाग








WTM लंडन पर्यटन प्रदर्शनात सहभाग


ITB बर्लिन पर्यटन प्रदर्शनात सहभाग - मार्च २०१४


हापूस महोत्सव (लंडन) – ०४ ते ०७ मे २०१३



# पर्यटन फेस्टीव्हल


श्रीवर्धन बिच फेस्टीव्हल


पर्यटन जनजागृती यात्रा - हरिहरेश्वर


कृषी पर्यटन महोत्सव, दापोली : २५ ते ३१ डिसेंबर २००६


कोकण बॅकवॉटर फेस्टीव्हल (गुहागर) २६ नोव्हेंबर २००४


सागरेश्वर बिच फेस्टीव्हल : २६ ते २७ जानेवारी २००७


गणपतीपुळे बिच फेस्टीव्हल (गणपतीपुळे)
२३ ते ३१ डिसेंबर २००६


केळवा-माहिम फूड फेस्टीव्हल : १० ते १२ डिसेंबर २०१०


सह्याद्री - चौकुळ ग्रामीण पर्यटन महोत्सव
(आंबोली, जि. सिंधुदुर्ग) १८ ते २० ऑगस्ट २०१२


हापूस पर्यटन महोत्सव


आंबा पर्यटन महोत्सव


हापूस पर्यटन महोत्सव (हडी) : २४ ते २९ एप्रिल २०१३


गुहागर बिच फेस्टीव्हल
२३ ते २५ डिसेंबर २०११

## ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव

• **कोकण खजिना :-** काजू, कोकम, आंबा, आंबापोळी, आमरस, जांभूळ या मौल्यवान फळांपासून प्रक्रिया केलेले पदार्थ मसाले, विविध पीठ उत्पादन करणारे छोटे व्यावसायिक, बचत गटांना आर्थिक उत्पन्नाची संधी देणारे दालन.

**गुंतवणूक दालन :-** आगामी काळात कोकणात पायाभूत सुविधांचा विकास झपाट्याने होत आहे. त्या अनुंषगाने गुंतवणूकीच्या संधी निर्माण होणार आहे. गुंतवणूक संधीची माहिती, प्रकल्पांची माहिती देणारे दालन.

• **उद्योग भूषन दालन :-** जागतिक स्तरावर स्वतःची व स्वतःच्या व्यवसायाची ओळख निर्माण करणाऱ्या उद्योग समूहाचे दालन.

• **फूड फेस्टीव्हल :-** कोकण खव्वैयांचा प्रदेश. ताजे मासे, कोंबडी वडे, खेकडा रस्सा, कोळंबी याबरोबर शाकाहारी पुरण पोळी, मोदक, घावण, आंबोळी, अळूवडी, सोलकडी यासारख्या पदार्थांचे कोळी - आगरी, भंडारी, मालवणी संगमेश्वरी भोजनाचा आस्वाद देणारे दालन.

• **लोककला प्रदर्शन :-** कोकणातील प्रत्येक जिल्हयांची लोककला वेगवेगळी या लोककलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न. रत्नागिरी जिल्हयाचे जाखडी नृत्य, ठाण्याचे आदिवासी तारपानृत्य, सिंधुदूर्गचा दशावतार, जाखडीनृत्य, काटखेळ, मंगळागौर, अशा विविध लोककला यावेळी पर्यटकांसमोर सादर करण्यात येतात.

• **हापूस आंबा महोत्सव :-** फळांचा राजा हापूस आंबा, आंबा हे कोकणाचे महत्त्वाचे फळपीक देश - विदेशातील वाढत्या मागणीमुळे अस्सल हापूसची चव घेता येत नाही. यासाठी हापूस आंबा महोत्सव. येथे आंबा उत्पादक विक्रेते बनतात. थेट विक्रीचा फायदा बागायतदारांना मिळतो.
• **उत्तम प्रतीचा दर्जेदार, नैसर्गिक पध्दतीने पिकवलेला आंबा विक्री.**
• **ग्राहकांची फसवणूक टाळणारा महोत्सव.**

**परिषदा :-**

कोकणला ग्लोबल बनविण्यासाठी विकासाचे ग्लोबल ध्येय साध्य करण्यासाठी कोकण विकासाच्या वेगवेगळ्या विषयांच्या परिषदांचे आयोजन करण्यात येते. त्या - त्या विषयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपस्थितांना मिळते.
• **पर्यटन परिषद :-** प्रत्यक्ष कोकणात पर्यटन व्यवसाय करणारे पर्यटन व्यावसायिक या परिषदेला उपस्थित असतात. हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट तज्ज्ञ आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी अत्यावश्यक सोई-सुविधा, कशा असाव्या, कोणत्या गोष्टी प्रामुख्याने आचराणात आणाव्यात, याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.
• **पायाभूत सुविधा :-** शासनातर्फे कोकणात होणारे पायाभूत सुविधांचे प्रकल्प, कोकणात गुंतवणूक प्रकल्पांची माहिती प्रझेटेंशन सादर केले जाते.
• **आधुनिक शेती :-** शेतकऱ्यांनी सामुदायिक शेती प्रकल्प सुरु करावेत. कोकणात कमी जमीन धारण क्षमता, पारंपारिक पध्दतीने बागायती त्यामुळे उत्पन्न कमी, कोकणातील शेतकऱ्यांनी आधुनिक विचारसरणी आत्मसात करुन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्पादन क्षमता वाढवावी, केळी, आंबा, काजू, मसाला पिके, नारळ या व्यापारी पिकांचे उत्पादन वाढवावे. यासाठी मार्गदर्शन करण्यात येते.
• तुकड्या तुकड्याच्या जमिनीवर शेती न करता सामुदायिक शेती पध्दतीने पिके घ्यावी. त्याचे व्यवस्थापन कसे असावे याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

## ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव

जगात सर्वाधिक पर्यटन सागर किनाऱ्यावर होते. परदेशातील बिचवर नेहमी गर्दी असते. कोकणातील किनारे एकांत शांत असतात. कोकणला विस्तीर्ण ७२० कि.मी. चा सागर किनारा लाभला आहे. केवळ एका वैविध्याला कृत्रिमतेचा, आधुनिक साधनांची जोड देत. परदेशात पर्यटन उद्योग फुलवला जातो. निसर्ग सुंदर कोकणात केवळ ६०-७० कि.मी. परिसरात निसर्गाची विविध रुपे पाहता येतात. कोकणला निसर्ग संपदेबरोबर ऐतिहासिक, पुरातन वारसा लाभला आहे. स्थापत्य, परंपरा, जैवविविधता, वन्यजीव, कला, संस्कृती, बॅकवॉटर्स, खाद्य, संस्कृती लाभली. नैसर्गिकदृष्टया कोकण पर्यटनासाठी आदर्श ठिकाण आहे.

कोकण पर्यटनाची प्रसिध्दी देशात त्याचबरोबर जागतिक स्तरावर होणे आवश्यक आहे. कोकण पर्यटनाची आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी करण्याच्या कृतीतील पहिल पाऊल म्हणजे **ग्लोबल कोकण महोत्सव.** या महोत्सवाव्दारे प्रथमच कोकण पर्यटनाच्या आंतरराष्ट्रीय प्रसिध्दीला सुरुवात झाली आणि त्यानंतर लगेचच आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सवात आम्ही सहभागी झालो.

### आंबा महोत्सव (लंडन) :-

कोकणातील हापूस आंब्याला जागतिक प्रसिद्धी मिळावी व युरोपच्या बाजारात हापूस आंब्याची बाजारपेठ विकसित व्हावी म्हणून कोकण भूमी प्रतिष्ठानमार्फत परदेशातील पहिला हापूस आंबा महोत्सव लंडन येथे दि. ४ मे ते ७ मे २०१३ या कालावधीत आयोजित करण्यात आला. या महोत्सवाला २०,००० पेक्षा अधिक भारतीय तसेच इंग्लंड मधील नागरिकांनी उपस्थिती दर्शवली.यावेळी आंब्याचे भव्य दालन उभारण्यात आले.यामध्ये रत्नागिरी व देवगड येथील अस्सल हापूस आंब्याची चव लंडनकरांना चाखता आली. कोकणातील काही शेतकरी त्यांचे आंबे घेऊन लंडन येथे या महोत्सवात सहभागी झाले. त्यांनी थेट निर्यातीचा अनुभव घेतला. याचवेळी लेस्टर येथील आयातदार, फळ व्यापारी व व्यावसायिक यांच्यासोबत कोकणातील शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली. कोकणच्या राजाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रसिध्दी देण्याचे काम या आंबा महोत्सवाने केले.

**आंबा महोत्सवातील उद्दिष्ट पूर्ती :-**

- **केवळ ६ तासात २००० डझन हापूसची विक्री.**
- **मुंबई व लंडन मधील व्यावसायिकांचा हापूस आंबा विक्रीसाठी समन्वय.**
- **आंबा आयातदार, फळ बागायतदार, व्यापारी शिष्टमंडळ भेट**
- **कोकण पर्यटनाची आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी**

### वर्ल्ड ट्रॅव्हल्स मार्ट (लंडन) व बर्लिन ट्रॅव्हल्स फेअर :-

कोकणच्या पर्यटनाची माहिती जगभर व्हावी, परदेशातील पर्यटकांना कोकणची निसर्ग समृध्दी, येथील पर्यटन स्थळे यांची माहिती व्हावी. यासाठी वर्ल्ड ट्रॅव्हल्स मार्ट (लंडन) व बर्लिन ट्रॅव्हल्स फेअर या जगातील सर्वात मोठ्या पर्यटन प्रदर्शनांमध्ये कोकण भूमी प्रतिष्ठानने महाराष्ट्र पर्यटन विकास महांमडळाच्या सहाय्याने कोकणचा स्टॉल लावला. यावेळी कोकणातील निसर्ग सौंदर्याचे प्रदर्शन परदेशी पर्यटकांसमोर करण्यात आले तसेच लंडन व बर्लिन येथील टूर ऑपरेटर्स सोबत चर्चासत्राचे आयोजन केले होते. त्यांना कोकणातील विविध पर्यटन स्थळांविषयी, त्यांच्या महत्त्वांविषयी माहिती देण्यात आली. पुढील काळात परदेशी पर्यटक या स्थळांना निश्चितच भेट देतील, असा विश्वास यावेळी मिळाला.

- **कोकण पर्यटन प्रसिध्दीसाठी आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शनात प्रथम सहभाग.**
- **परदेशी टूर ऑपरेटर्स सोबत चर्चा.**
- **टूर ऑपरेटर्ससोबत समन्वय.**

## पर्यटन

कोकणातील पर्यटनाला प्रसिध्दी मिळावी यासाठी गेली १५ वर्षे या चळवळीच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये कोकणच्या विविध सागर किनाऱ्यांवर बीच फेस्टीव्हल, बॅकवॉटर फेस्टीव्हल, खाद्य महोत्सव यांचे आयोजन केले जाते. यामुळे देशभरात कोकणची प्रसिध्दी होण्यास मदत झाली आहे. या महोत्सवाच्या आयोजनामुळे कोकण पर्यटनाची खऱ्या अर्थाने प्रसिध्दी झाली. प्रतिष्ठानने छोट्या - मोठ्या असंख्य महोत्सवांचे आयोजन केले आहे. त्यापैकी प्रमुख महोत्सवांची माहिती खाली दिली आहे.

| क्र. | महोत्सव | दिनांक | स्थळ | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | कोकण बॅकवॉटर फेस्टीव्हल | २६ नोव्हेंबर २००४ | दाभोळ | ५००० |
| २. | गणपतीपुळे बिच फेस्टीव्हल | २३ ते ३१ डिसेंबर २००६ | गणपतीपुळे | २०००० |
| ३. | श्रीवर्धन बिच फेस्टीव्हल | २३ ते २५ जानेवारी २०१० | श्रीवर्धन | ५०००० |
| ४. | गुहागर बिच फेस्टीव्हल २०११ | २३ ते २५ डिसेंबर २०११ | गुहागर | २०००० |
| ५. | चिकू महोत्सव | ०९ व १० फेब्रुवारी २०१३ | डहाणू | १०००० |

**बीच फेस्टीव्हल :-**

विस्तीर्ण सागरकिनारपट्टी लाभलेल्या कोकणात १०० हून अधिक बीचेस आहेत. यातील गणपतीपुळे, गुहागर, श्रीवर्धन, तारकर्ली यांसारखे काही बीच वगळता अनेक बीच पर्यटकांना अजून अज्ञात आहेत. कोकणातील प्रसिध्द सागरकिनाऱ्यांपेक्षा पर्यटकांना माहित नसलेले समुद्रकिनारे प्रकाशात यावेत. या सागरकिनाऱ्यांना प्रसिध्दी मिळावी. येथे पर्यटन व्यवसायाचा विकास व्हावा. यासाठी ग्लोबल कोकण बीच फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात येत आहे.

- **या फेस्टीव्हलमुळे त्या-त्या बिचवर होम स्टे, हॉटेल, निवास-न्याहरी व्यवसाय आदि उभे राहिले आहेत.**
- **पर्यटन व्यवसायाला सुरुवात.**
- **पर्यटन आधारित अर्थव्यवस्थेला सुरुवात.**

**वॉटरस्पोर्टस् :-**

कोकणात विस्तीर्ण सागर किनाऱ्यांचा वापर करुन वॉटरस्पोर्टस्‌चा विकास करता येईल. पण काही वर्षांपूर्वी यांची परवानगी मिळत नव्हती. ६ वर्षांपूर्वी बंदर विकास तज्ज्ञ **कॅ. श्री. अरुण करकरे** यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानने एक नियमावली तयार करुन शासनाला सादर केली. महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी **अधिकारी श्री. श्रीवास्तव** यांनी या नियमावलीस मान्यता दिली.

- **या मान्यतेमुळे कोकणात अधिकृत वॉटरस्पोर्टस् केंद्रे सुरु झाली.**
- **संपूर्ण कोकणात १०० हून अधिक वॉटरस्पोर्टस् केंद्र सुरु.**
- **शासनाला महसूली उत्पन्न सुरु.**

**ग्रामीण व सागरी पर्यटन :-**

कोकणातील अनेक गावे नितांत सुंदर व निसर्गसमृध्द आहेत. या गावांना संस्कृती, लोककला व परंपरा यांचा समृध्द वारसा लाभलेला आहे. अशा गावांमध्ये प्रतिष्ठान ग्रामीण पर्यटन विकसित करीत आहे. ग्रामीण पर्यटनांतर्गत आंबवली, नाते, चौकूळ या गावांमध्ये सह्याद्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. आंबवली गावामध्ये ३००, नाते गावात २५० पर्यटक येऊन राहिले. चौकूळ गावात वर्षभरात १००० पर्यटक येऊन राहिले. तर २५०० पर्यटकांनी या गावाला भेट देऊन ग्रामीण पर्यटनाचा आनंद घेतला. शहरवासियांना ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

# पर्यटन

**ग्रामीण पर्यटन विकास योजना (५० कोटींची तरतूद) :-**

कोकणात पर्यटन विकास होत असताना नागरी समस्या निर्माण न करता निसर्ग पूरक पर्यटन वृध्दीगत व्हावे, यासाठी कोकण भूमी प्रतिष्ठान नेहमीच कृषी ग्रामीण पर्यटनाला प्राधान्य देत आली. त्याचबरोबर पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या गावांचा विकास करताना गावाबाहेरील पर्यटन व्यवसायिकांनी नाही तर स्थानिक ग्रामस्थांनी स्वतःचा आणि गावचा विकास करावा, ही संकल्पना प्रतिष्ठानची होती.

**कोकण भूमी प्रतिष्ठानची ही संकल्पना समजून घेऊन ग्लोबल कोकण महोत्सवाच्या व्यासपीठावर बोलताना मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी कृषी ग्रामीण पर्यटनाचा प्रस्ताव बनविण्याच्या सूचना कोकण भूमी प्रतिष्ठानला दिल्या आणि त्यासाठी शासनातर्फे दरवर्षी निधी देण्यात येईल असे जाहीर केले.**

**कोकण भूमी प्रतिष्ठानने ग्रामीण पर्यटनाचा सविस्तर प्रस्ताव शासनाला (फेब्रुवारी - मार्च २०१३) ला सादर केला. हा प्रस्ताव राज्याचे माजी मुख्य सचिव मा . अरुण बोंगिरवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार मा. भाई जगताप यांच्या पुढाकाराने तयार करण्यात आला. या योजनेसाठी २३ गावे प्रतिष्ठानने निवडली ठाणे जिल्हयातील वाळवंड, नांदगाव, अर्नाळा, रायगड जिल्हयातील काशिद, नाते, दिवेआगर, कुडपण, रत्नागिरी जिल्हयातील आंबवली, म्हाळुंगे, पन्हाळेकाझी, कर्दे, लाडघर, मुरुड, मुंढे, कसबा व सिंधुदूर्ग जिल्हयातील कुणकेश्वर, हडी, काळसे, निवत्ती - भोगवे, उभादांडा, तेंडोली, चौकूळ ही गावे निवडली. या गावांत ग्रामबैठका घेऊन ग्रामस्थांची मानसिकता तयार करण्यात आली तसेच ग्रामसभेत ठराव संमत करण्यात आले. संपूर्ण गाव पर्यटन उद्योगात सहभागी होत आहे.**

**महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी समिती गठीत केली आणि समितीमध्ये प्रतिष्ठानचा समावेश केला. या प्रकल्पाअंतर्गत कोकणातील पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची गावे विकसित करण्यात येणार आहे. एकूण गावांपैकी काही गावे सह्याद्रीच्या डोंगरातील तर काही गावे सागर किनाऱ्यावरील निवडण्यात आली. सह्याद्री पर्यटन व बीच पर्यटन अशा दोन प्रकारच्या मॉडेलचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला. सागरकिनाऱ्यांवर पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात दरवर्षी ५० कोटी रुपयांची तरतूद झाली. ग्रामीण पर्यटनास चालना देण्यासाठी कोकण पर्यटन विकास कार्यक्रम हा लेखाशिर्ष तयार झाला.** (सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. संकेताक २०१३११०६१२१३४४२४२० असा आहे) **हे कोकण भूमी प्रतिष्ठानचे सर्वात मोठे यश आहे. या योजनेंतर्गत १०० हून अधिक गाव १० वर्षात विकसित होणार आहे. कोकण भूमी प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कोकणातील ग्रामीण व सागरी पर्यटनाला चालना देणारा ग्रामीण पर्यटन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या योजनेमुळे पर्यटनाचे केंद्रीकरण न होता गावा-गावात पर्यटक विखुरले जातील. पर्यटक वेगवेगळ्या गावांना भेट देऊ शकतील.**

या योजनेंतर्गत गावात जोडरस्ते, प्रवेशव्दार, स्वागतकक्ष, सागर किनाऱ्यावर, टॉयलेटस्, पार्किंग व्यवस्था, सामुदायिक कॅफेटेरिया, वॉचटॉवर यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार असून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. प्राथमिक स्तरावर शासनातर्फे ही २५ गावे विकसीत केली जात असून पुढील प्रयत्नात अशीच आणखी काही गावे विकसित केली जाणार आहेत.

शहरातील व परदेशातील पर्यटकांना कोकणातील निसर्ग समृध्दीचा, ग्रामीण जीवनाचा तसेच खाद्य व लोककला संस्कृतीचा, ग्रामीण भारताचा खरा अनुभव घेता येईल. यामुळे गावा-गावात आर्थिक विकासाची क्रांती होईल. गावातील महिलांना, तरुणांना, शेतकऱ्यांना रोजगार मिळेल. शेतकऱ्यांच्या घरांमध्ये पर्यटक राहतील.

**कोकणच्या ग्रामीण समृध्द संस्कृतीचा आणि कोकण पर्यटनाचा जागतिक ब्रॅण्ड विकसीत करण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे.**

# पर्यटन

**कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्था :-**

कोकणात अनेक निसर्गसमृध्द गावे आहेत. समुद्र किनाऱ्यावरील, नदी /खाडी किनाऱ्यावरील, सह्याद्रीतील निसर्ग समृध्द गावांमध्ये ग्रामीण व कृषी पर्यटनाची केंद्रे निर्माण व्हावीत यातून गावागावात आर्थिक समृध्दी यावी. यासाठी कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्थेच्या माध्यमातून आम्ही प्रयत्न सुरु केला आहे. **कृषी पर्यटन तज्ज्ञ श्री. प्रभाकर सावे हे या संस्थेचे प्रमुख आहेत. प्रतिष्ठानच्या माध्यमातून १०० हून अधिक कृषी पर्यटनाची केंद्रे कोकणात सुरु झाली आहेत.**

कोकणातील पर्यटन म्हणजे केवळ मौज मस्ती असे स्वरुप राहू नये. निसर्ग, पर्यावरण, ग्रामीण जीवन, लोककला, संस्कृती हे सर्व समजून घेण्यासाठी व खरा भारत पाहण्यासाठी पर्यटकांनी कोकणात यावे. या सर्व पर्यटकांना कृषी पर्यटन केंद्रात रहाता यावे. यासाठी गावा-गावात हजारो कृषी पर्यटन केंद्र सुरु करण्यात येत आहेत. ज्या शेतकऱ्यांना कृषी पर्यटन केंद्र उभी करायची आहेत. त्यांना संस्था मार्गदर्शन करते. कृषी पर्यटन केंद्र उभारणीसाठी सहकार्य करण्यासाठी कृषी परिषदा, अभ्यासदौरे यांचे आयोजन करण्यात येते.

या परिषदेतून कृषी पर्यटन केंद्र कशी उभारावी, कशी चालवावी याचे मार्गदर्शन प्रात्यक्षिकासह देण्यात येते.

- पर्यटन संस्थेच्या मार्गदर्शनामुळे १०० हून अधिक नवीन पर्यटन केंद्रे सुरु.
- कृषी मालाला चांगला दर : विक्री व्यवस्था उभी राहिली.
- पर्यटकांकडून प्रक्रिया मालाची, कोकणी मेव्यांची खरेदी
- नाशवंत कृषी मालावर प्रक्रिया सुरु.
- गावागावात अर्थव्यवस्थेला चालना.
- शेतकऱ्यांना शेतीशिवाय उत्पन्नाचे पर्यायी साधन उपलब्ध.
- शेती हंगामा व्यतिरिक्त काळात शेत मजुरांना रोजगार उपलब्ध.
- कृषी पर्यटनातून पर्यावरण व निसर्गाचे संरक्षण
- गावातील ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसांचे जतन.

**कोकण पर्यटन उद्योग संघ (या संघाचा नोंदणी क्र. ए.एल.सी/कार्यासन-१७/११०४७ आहे.):-**

**कोकणातील १० हजार पर्यटन व्यावसायिकांची ही संघटना आहे. १ लाख पर्यटनप्रेमी व्यक्तींचा पाठींबा आहे. अध्यक्ष माधव भांडारी आणि सरचिटणीस संजय यादवराव आहेत.**

**कोकण भूमी प्रतिष्ठानतर्फे कोकण पर्यटन वाढीसाठी परिषदा चर्चासत्र, विविध महोत्सव यांचे आयोजन करत असताना आंतरराष्ट्रीय पर्यटनदृष्टया प्रसिध्दी करताना, पर्यटन उद्योजकांना अनेक समस्यांना, अडचणी यांना तोंड द्यावे लागत असल्याचे निदर्शनात आले.**

**या सार्वत्रिक समस्या, केवळ शासनाच्या माध्यमातून सोडविता येणे शक्य असल्याचे तसेच पर्यटन व्यावसायिक व शासन यांच्यामधील समन्वयासाठी मध्यस्थ संस्थेची गरज प्रकर्षाने पुढे आली. या गरजेतून कोकण पर्यटन उद्योग संघाची स्थापना झाली.**

पर्यटनाला अधिक प्रमाणात चालना मिळावी व पर्यटन व्यावसायिक संघटीत व्हावेत यासाठी पाचही जिल्हयात स्थापना करण्यात आली आहे. या फोरमच्या पाचही जिल्हयात बैठका आयोजित केल्या जातात. यातून कोकणातील अनेक तरुणांनी हॉटेल, रिसॉर्टस् यांसारखे पर्यटन प्रकल्प उभे केले आहेत. त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळावे, असा आमचा प्रयत्न आहे. भविष्यात अशा स्वरुपाचे प्रकल्प उभारले जाणार आहेत. शासनाच्या माध्यमातून विविध योजना राबवण्यासाठी व येणाऱ्या अडचणींना सोडवण्यासाठी कोकण पर्यटन उद्योग संघ कार्यरत आहे.

## पर्यटन

शासनाच्या नवीन कोकण पर्यटन विकास धोरणामुळे कोकणात पर्यटन व्यवसायामध्ये मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कोकण पर्यटन उद्योग संघाची स्थापना केली गेली आहे. शासनाच्या धोरणास मदतरुप होऊन कोकणात पर्यटन वाढविण्यासाठी तसेच या संधीचा लाभ कोकणातील उद्योजकांना मिळावा व नवीन उद्योजकांना पर्यटन व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, असा सकारात्मक विचार संघाची स्थापना करण्यामागे आहे. पर्यटन व्यावसायिकांना आपल्या अडी-अडचणी शासनापुढे मांडता याव्या, नवीन विचार व व्यवसायाची देवाण-घेवाण करता यावी यासाठी उद्योग संघाच्या रुपाने एक हक्काचे व्यासपीठ उद्योजकांना उद्योग संघाच्या रुपाने मिळाले आहे.

निसर्गरम्य कोकणला पर्यटकांची पसंती मिळत आहे हे कोकणात येणाऱ्या पर्यटकांच्या वाढत्या संख्येवरुन दिसत आहे. पर्यटनाव्दारे कोकणचा व पर्यायाने राज्याचा विकास साधण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह आहे. यासाठी कोकणात आज केलेली गुंतवणूक भविष्यात राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देणारी ठरेल यात शंका नाही. आपण उद्योजकही एकत्र येऊन कोकण पर्यटन विकासात आपले योगदान देऊया व त्या बरोबरच आपला व्यक्तिगत विकासही साधूया.










## कोकण पर्यटन व्हिजन परिषद २०१६

जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून कोकण पर्यटन उद्योग संघ व कोकण भूमी प्रतिष्ठानतर्फे कोकण पर्यटन व्हिजन २०१६ या परिषदेचे आयोजन २७ सप्टेंबर २०१६ रोजी नरीमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते. कोकणातील ५ ही जिल्हयातील सुमारे ६०० पर्यटन व्यावसायिकांची उपस्थिती हे या परिषदेचे वैशिष्टय होते. **या परिषदेप्रसंगी कोकणातील पर्यटन व्यावसायिकांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व पर्यटनमंत्री मा. जयकुमार रावळ यांना सादर केलेले निवेदन :-**

- कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन, होम स्टे, हॉटेल्स, रिसॉर्टस, वॉटरस्पोर्टस्, ॲडव्हेंचर टूरीझम पॉलिसीज निश्चित करणे व इन्सेंटीव्ह, नियम, अटी नियमित करणे.
- कोकणातील प्रमुख ५० पर्यटनस्थळे, विकासाचा मास्टरप्लॅन बनवणे व येथील पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार व अन्य माध्यमातून दरवर्षी २००० कोटींचा आर्थिक निधी पुढील ५ वर्षे उपलब्ध करावा.
- पश्चिम महाराष्ट्रातील द्राक्ष वाईन प्रमाणे (आंबा, काजू, चिकू, जांभूळ, करवंद) वाईन उद्योगाला एक्साईज माफी व प्रकल्प खर्चावर सबसिडी द्यावी.
- पायाभूत सुविधा महत्वाची पर्यटनस्थळे यांना जोडणारे रस्ते मोठे करणे व सुस्थितीत आणणे. समुद्र किनाऱ्यावर आधुनिक टॉयलेट्स, पर्यटनस्थळांवर पार्किंगची व्यवस्था, पर्यटन माहिती केंद्र, उद्याने इत्यादी.
- २०१६ पर्यंत पर्यटनासाठी भूमीपूजनासाठी केलेली बांधकामे यांना संरक्षण देणे.
- सीआरझेड ची सुटसुटीत व सर्वसामान्यांना कळेल अशी नियमावली / पुस्तिका तयार करणे. २ ते १५ खोल्यांच्या छोट्या प्रकल्पांसाठी जिल्हा स्तरावर परवानग्या मिळणे.
- होम स्टे, ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन घरगुती दराने वीज हॉटेल / रिसॉर्ट / मोठे प्रकल्प उद्योगाचा दर्जा व औद्योगिक दराने वीज पुरवठा (शेतकऱ्यांप्रमाणे वीज सबसिडी)
- वॉटर स्पोर्टस व अन्य लायसन्स ५ वर्षांतून एकदा रिन्यूवल, भूमीपुत्रांना प्राधान्य, टेंडर प्रक्रिया नको.
- कृषी, ग्रामीण व होम स्टे प्रकारात १० लाख पर्यंतच्या प्रकल्पांना ४० टक्के सबसिडी देणे. पुढील १० वर्षाला ४०० कोटी सबसिडीमध्ये १०००० नवीन प्रकल्पांची निर्मिती होऊ शकते.
- पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग संपूर्ण कोकण विभाग पर्यटन विभाग म्हणून घोषित करणे.
- शासन, प्रशासन, पर्यटन व्यावसायिक, पर्यटन तज्ज्ञ समन्वय समिती स्थापन करणे

**कोकणसाठी स्वतंत्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना महामंडळाच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ३०५५ कोटी रुपयांचे विशेष पॅकेज, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र आय. ए.एस. अधीकारी स्वतंत्र पर्यटन संचनालय हे निर्णय कोकण पर्यटन विकासात महत्त्वाचे ठरणार असल्याने श्री. यादवराव यांनी मा. मुख्यमंत्री व मा. पर्यटनमंत्री यांना विशेष धन्यवाद दिले.**

**कोकणातील गावांचा आंतरराष्ट्रीय पर्यटनदृष्टया विकास व्हावा यासाठी एजन्सी नेमावी. महत्त्वाच्या ५० गावांचा मास्टर प्लॅन बनवावा. ही गावे युरोपच्या दर्जाची बनविण्यासाठी पर्यटनस्थळी रस्ते, सुरक्षा व्यवस्था, प्रसाधन, पायाभूत सुविधा यांचा विकास १० वर्षात टप्प्या - टप्प्यात करावा अशी मागणी उद्योग संघाच्या वतीने श्री. संजय यादवराव यांनी केली.**

**वरील गोष्टींची पूर्तता झाल्यास १ लाख कोटींची अर्थव्यवस्था उभी राहील, गावातील एकही माणसाला मुंबईत यावे, लागणार नाही. मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांचे मनोगत (समारोप) :-**

- **कोकणातील ५० गावांचा पर्यटन विकास आराखडा तयार करण्यास शासन मदत करेल.**
- **कोकण हे जगातील सर्वोत्कृष्ट पर्यटन स्थळ बनविणार.**
- **सी वर्ल्ड प्रकल्प ३५० एकर जमिनीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे राबविणार.**
- **कोकण पर्यटन उद्योग संघातर्फे देण्यात आलेल्या निवेदनातील १० मागण्यांवर राज्य सरकार सकारात्मक आहे.**
- **येत्या ५ वर्षामध्ये पर्यटन विकासात कोकण अग्रेसर असेल.**

**पर्यटनमंत्री मा. जयकुमारजी रावळ यांचे मनोगत :-**

- **कोकणातील पर्यटन व्यावसायिकांना CRZ प्रकरणी विशेष सवलत देण्यात येईल.**
- **पर्यटन वृध्दीसाठी कोकण किनाऱ्यावर सनबाथ उपक्रम राबविणार.**
- **खासगी कंपन्यांच्या सहकार्याने गड, किल्ल्यांचा विकास करणार.**

## लाडघर बीच फेस्टीव्हल

**कोकणातील शांत विस्तीर्ण अनाघ्रात बिच प्रसिध्दीस आणणे. पर्यटकांनी कोकणातील बिचची माहिती मिळून पर्यटकांनी वेगवेगळ्या बिचला भेट द्यावी असा प्रयत्न नेहमीच कोकण भूमी प्रतिष्ठानचा राहिला आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून यावर्षी दीपावलीमध्ये दापोली तालुक्यातील लाडघर बीचवर फेस्टीव्हल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टीव्हलासाठी दापोली व गुहागर तालुक्यातील पर्यटक व्यावसायिकांना सहभागी करत त्यांच्या हॉटेलमधील पर्यटकांना या महोत्सवात सहभागी करण्यात आले. तसेच मुंबई - पुणे शहरातील टूर व्यावसायिकाव्दारे पर्यटक बिचला भेट देतील, अशी व्यवस्था करण्यात आली होती.**

- दररोज १० हजार पर्यटकांची भेट.
- ग्रामीण जीवनाचा अनुभव.
- स्वित्झर्लंडच्या पर्यटकांचा सहभाग.
- कोकणातील सागर किनाऱ्यावर प्रथमच क्राफ्ट बियरचा स्टॉल.
- आंबा बिअर, आंबा वाईनचा पर्यटकांकडून आस्वाद, कॅम्पफायर कार्यक्रम.
- बैलगाडी सफारी.
- स्थानिक महिला बचत गटांचा, कोकणी फूड, कोकणी ब्रेकफास्ट स्टॉल / विक्री
- फ्रेश, फिश बार्बेक्यु
- भंडारी फूड फेस्टीव्हल
- फिशरमन व्हिलेज म्युझियम
- आर्ट फेस्टीव्हल
- डॉल्फीन सफारी, नौकानयन, वॉटरस्पोर्टस्
- पर्यटकांना घेतला ग्रामीण जीवन अनुभव
- २०० वर्षापूर्वीचे वास्तुशास्त्र अनुभव
- शाकाहारी पारंपारिक पदार्थाचा पर्यटकांनी घेतला आस्वाद
- कृषी - मसाला बाग पहाणी / भटकंती
- आर्ट वर्कशॉपमध्ये पर्यटकांचा सहभाग
- कोकणी मेव्याच्या स्थानिक लोकांचा स्टॉल
- या महोत्सवामुळे स्थानिक, छोटे, व्यापारी, महिला बचत गट, कोकणी मेवा विक्रेत्यांच्या उत्पादनाची विक्री.
- महोत्सव कालावधीत सुमारे ५० लाखांची आर्थिक उलाढाल.
- लाडघर बिचची मोठ्या शहरात प्रसिध्दी.
- स्थानिक कलाकारांच्या कलांचे प्रदर्शन / व्यासपीठ मिळाले.

# पर्यटन फेस्टीव्हल


सह्याद्री महोत्सव, आंबवली(खेड) : ३० डिसेंबर २०११ ते ०१ जानेवारी २०१२


चिकू महोत्सव (डहाणू) : ०१ व ०२ फेब्रुवारी २०१४



केळवा-माहिम फूड फेस्टीव्हल


चिकू महोत्सव (डहाणू) : ०९ व १० फेब्रुवारी २०१३


हापूस पर्यटन महोत्सव (महाड - नाते) : १९ ते २० एप्रिल २०१३


सागरेश्वर बिच फेस्टीव्हल : २६ ते २७ जानेवारी २००७


सह्याद्री महोत्सव, आंबवली(खेड)
३० डिसेंबर २०११ ते ०१ जानेवारी २०१२


चिकू महोत्सव (डहाणू) : ०१ व ०२ फेब्रुवारी २०१४


गणपतीपुळे बिच फेस्टीव्हल (गणपतीपुळे)
२३ ते ३१ डिसेंबर २००६


गुहागर बिच फेस्टीव्हल
२३ ते २५ डिसेंबर २०११


श्रीवर्धन बिच फेस्टीव्हल

# कोकण पर्यटन उद्योग संघ आयोजित कोकण पर्यटन व्हिजन परिषद



















# लाडघर बीच फेस्टीव्हल
















# कोकण जलपरिक्रमा


कोकण भूमी प्रतिष्ठान -जल बिरादरी महाराष्ट्र - हिरवळ प्रतिष्ठान - सिंधुभूमी फाउंडेशन
भव्य जलचेतना परिषद
पाणी, शेती, फलोद्यान, प्रक्रिया आणि पर्यटन
कोकण विकासाची पंचसूत्री






















Typology and geology

## जलसमृध्द कोकण अभियान

कोकण ३००० मि.मी. पावसाचा प्रदेश. पावसाळ्यात दुथडी भरुन वाहणाऱ्या नद्या उन्हाळ्यात मात्र कोरड्या पडतात. पावसाळ्यात पूर तर उन्हाळ्यात दुष्काळ अशी परस्पर विरोधी परिस्थिती कोकणात असते. डोंगर - उताराच्या भौगोलिक रचनेमुळे नद्यांचे डोह गाळाने भरले आहे. पाण्याच्या दुर्भिक्षामुळे व्यापारी शेती नाही. त्यामुळे आर्थिक विकास अशक्य; नोकरी व्यवसायासाठी ग्रामस्थांनी मुंबई - पुणे शहराची वाट धरली. यासाठी कोकण भूमी प्रतिष्ठान जलसमृध्द कोकण अभियान राबवीत आहे.

पाणी हा जागतिक प्रश्न बनला आहे. पाणी प्रश्नी जनजागृती करण्यासाठी कोकण भूमी प्रतिष्ठानने दादर शिवाजी पार्क येथील वीर सावरकर सभागृहातून जलपरिषदेचे आयोजन केले होते. रॅमन मॅगासेसे व Stockholm Water Prize (जलक्षेत्रातील नोबेल) विजेते राजेंद्रसिंह यांनी यावेळी उपस्थितांना प्रेझेंटेशन सह मार्गदर्शन केले. पाण्यासाठीच्या लढ्यातील आपले अनुभव सांगितले या परिषदेला सुमारे ७०० लोक उपस्थित होते.

**डॉ. सिंह यांचे अनुभव, पाणी प्रश्नांचे गांभीर्य जीवनातील पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन पाणी प्रश्नी जनचळवळ किती महत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन कोकण भूमी प्रतिष्ठानने पाणी विषयावर काम करण्याचे ठरविले. यासाठी कोकणातील पाणी समस्या भीषण असलेल्या गावात नदी पुनर्जीवन अभियान राबविण्याचे निश्चित केले. कोकणातील नद्यांचा अभ्यास करुन गांधारी (रायगड), जगबुडी ( खेड, रत्नागिरी), अर्जुना (राजापूर, रत्नागिरी), जानवली (कणकवली, सिंधुदूर्ग) या नद्या दत्तक घेण्याचे ठरविले.**

नदी प्रश्नी काम करताना व्यापक जनजागृती करण्यासाठी **दि. १५ ते १९ जानेवारी २०१६** हा पाच दिवसांचा जलपरिक्रमा व जलचेतना परिषदेचा कार्यक्रम निश्चित केला. संत समाज आणि शासन यांच्या समन्वयातून कोकण जलसमृध्द हे ध्येय निश्चित करण्यात आले.

या चळवळीला जागतिक कीर्तिचे जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांचे मार्गदर्शन लाभत आहे. पाणी प्रश्नी लोकचळवळ उभी करण्यासाठी मुंबई ते कणकवली जलपरिक्रमा कार्यक्रम झाला. हे पाच दिवस स्वतः डॉ. राजेंद्रसिंह उपस्थित होते. त्या-त्या ठिकाणच्या परिषदेप्रसंगी त्यांनी जनतेला मार्गदर्शन केले.

**दि. १५ जानेवारी २०१६ :- उद्घाटन सिध्दीविनायक मंदिर, प्रभादेवी, उपस्थिती : ५०० कोकणवासीय**

**प्रमुख उपस्थिती : पद्मभूषण न्यायधीश चंद्रशेखर, धर्माधिकारी, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव द.म.सुकथनकर आणि माजी मुख्य सचिव, अरुण बोंगिरवार, श्री. मुप्पीन काडसिध्देश्वर स्वामी, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर.**

**दि. १६ जानेवारी २०१६ :- बुटाला सभागृह, महाड, उपस्थिती : ४००० कोकणवासीय**

**प्रमुख उपस्थिती : जलसंपदामंत्री मा. गिरीष महाजन, ग्रामविकास राज्यमंत्री मा. दीपक केसरकर**

**दि. १७ जानेवारी २०१६ :- म्हाळुंगे, खेड, उपस्थिती : ५००० कोकणवासीय**

**प्रमुख उपस्थिती : मा. मुख्यमंत्री देंवेंद्रजी फडणवीस, शिक्षणमंत्री मा. विनोदजी तावडे, राष्ट्रीय भटक्या - विमुक्त जाती जमातीचे अध्यक्ष दादा इदाते, कामगार मंत्री मा. प्रकाश मेहता.**

**दि. १८ जानेवारी २०१६ :- गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी**

**विज्ञान अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी विशेष उपस्थिती राजस्थान विद्यापीठाचे माजी कुलगुरु अरुण सावंत, जगतगुरु स्वामी जयमृत्युंजय.**

## जलसमृध्द कोकण अभियान

ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ ओणी, उपस्थिती : २५०० कोकणवासीय

**विशेष उपस्थिती : उद्योगपती रविंद्र प्रभूदेसाई, रत्नागिरीचे माजी आमदार बाळ माने, राजापूरचे अर्बन बँकेचे चेअरमन जयंत अभ्यंकर.**

**दि. १९ जानेवारी २०१६ :- भगवती मंगल कार्यालय, कणकवली, उपस्थिती : ३००० कोकणवासीय**

**विशेष उपस्थिती : महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री बबनराव लोणीकर, कर्नाटक राज्याचे पाणीपुरवठा मंत्री एम.बी.पाटील, कर्नाटकचे खनिकर्ममंत्री विनय कुलकर्णी, भाजपचे प्रदेश प्रवक्ते माधव भांडारी.**

- मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी म्हाळुंगे येथील परिषदेनंतर परिक्रमेतील चार नद्यांचे तातडीने सर्वेक्षण करण्याचे तसेच अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.
- जगबुडी नदीचा ६८.४४ कोटीचा
- अर्जुना नदीचा १०९.९४ कोटी
- जानवली नदीचा ३९.४० कोटीचा
- चार नद्यांवर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.
- गांधारी नदीवर हिरवळ प्रतिष्ठानतर्फे १८ बंधारे बांधण्यात आले
- सौंदळ येथे अर्जुना नदीला ओझर नदी मिळते, या ठिकाणी नदीवरील साखळ कोंड व चांभार कोंड या दोन डोहांमधील गाळ ग्रामस्थांनी श्रमदान करुन काढला.
- ताम्हाने गावातील डोंगरावर समतोल चर खणण्यात आले आहे. जगबुडी नदीवरील किंजळे गावातील पाय रोवणे डोह जवळजवळ १०-१२ फूट खोल झाला आहे.
- नदीपात्रही जवळ जवळ ५० फूट रुंद झाले आहे.
- एक बंधारा बांधला व नदी किनाऱ्यालगत दगडांची मजबूत भिंतही बांधली आहे.
- जानवली नदीसाठी सीसीआरमधून दोन कोटी रुपयांची तरतूद
- मिनी आराखडा तातडीने तयार करण्यात आला.
- या निधीतून गाळ काढणी, छोटे बंधारे बांधणे व त्या अनुषंगाची कामे करण्यात येणार आहेत.
- कोकणात पाणी प्रश्नी जनचळवळ उभी राहिली आहे.
- गावा-गावात वहाळ - डोह यांच्यातील गाळ काढणे. बंधारा बांधणे डोहाचे खोलीकरण रुंदीकरण कामांना सुरुवात झाली.
- ही जलचळवळ जनचळवळ म्हणून उभी राहत आहे.
- सर्वसामान्य लोक पाणी प्रश्नी जागरुक होऊ लागले आहेत. सजग होत आहे.
- नदी काठावर आधुनिक शेती, सामुदायिक शेती प्रकल्प सुरु करण्याचे ग्रामस्थांचे प्रयत्न सुरु.

**जलसमृध्द कोकण प्रतिष्ठान :-**

कोकणातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जलसमृध्द कोकण प्रतिष्ठान या फाऊंडेशनची निर्मिती करण्यात येत आहे. सदर कार्यासाठी सरकारी मदत मिळविणे, सीएसआर निधी उभा करणे, जल विषयातल्या तज्ज्ञांची समिती स्थापन करणे. मुंबई व पुणे शहरातील मोठ्या फाऊंडेशनचे सहकार्य घेणे आदी मार्गाने सहकार्य केले जाईल. कोकणातील ज्या ग्रामस्थांनी स्वतःच्या गावात लोकचळवळीतून, श्रमदानाने नद्यांतील गाळ काढणे, नदी खोलीकरण बंधारा बांधणे यासारखी जलव्यवस्थापनाची कामे केली आहेत. त्यांना सहकार्य करण्याचे काम हे फाऊंडेशन करणार आहे.

## कोकण भूमी प्रतिष्ठानचे आगामी उपक्रम

➢ **ग्लोबल कोकण महोत्सव :-** एप्रिल-मे २०१७ मध्ये ग्लोबल कोकण महोत्सव वाशी येथे होत आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. गेली ५ वर्ष या महोत्सवाने खऱ्या अर्थाने कोकण पर्यटनाचे जागतिक मार्केटिंग केले.

यावर्षीच्या महोत्सवात कोकण पर्यटन प्रसिध्दीवर भर देण्यात येणात आहे. कोकणातील पर्यटन व्यावसायिकांचे पर्यटन दालन असणार आहे. खव्वैयांची रसना तृप्त करण्यासाठी फूड फेस्टीव्हलचे विशेष दालन, कोकणी पदार्थांचे विक्री दालन, कोकण खजिना, छायाचित्र प्रदर्शन ही विशेष दालन असणार आहेत.

➢ **पर्यटन महोत्सव :-** कोकणातील विविध सागरकिनाऱ्यांवर बीच फेस्टीव्हल तसेच बॅकवॉटर फेस्टीव्हल, सह्याद्री महोत्सव कृषी पर्यटन महोत्सव आयोजित करुन अधिकाधिक पर्यटकांना कोकणाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न या महोत्सवाव्दारे करण्यात येतो.

➢ **बीच फेस्टीव्हल :-** कोकणातील रुपेरी वाळूचे शांत, विस्तीर्ण, रमणीय बिच प्रसिध्दीत आणणे, महोत्सव आयोजित करुन लोकांना बिचची माहिती देणे. पर्यटन वाढविणे या उद्देशाने बीच फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात येते. बीच फेस्टीव्हल कार्यक्रम :

**१) हेरिटेज अलिबाग :-** अलिबाग तालुक्याला प्राचीन आणि १५०० वर्षाचे ऐतिहासिक महत्त्व आहे. यादृष्टीने महत्त्वाच असलेले हे ठिकाण नितांत सुंदर बीचसाठी प्रसिध्द आहे. या महोत्सवाप्रसंगी आपण प्राचीन मंदिर, ऐतिहासिक गड, बारा बलुतेदार पध्दतीन, आगरी फूडची चव घेऊ शकतो.

**२) फिशरमन व्हिलेज -उरण :-** उरण मुंबई नजीकच मच्छीमार गाव. या गावात फेस्टीव्हल आयोजित करण्यात येत आहे. यावेळी बीचवर विविध कार्यक्रम होणार आहेत.

**३) चिकू फेस्टीव्हल, बोर्डी :-** पालघर जिल्हयातील बोर्डी गाव चिकू उत्पादनात अग्रेसर आहे. चिकू बागेची भटकंती या फेस्टीव्हलमध्ये करता येईल. आदिवासाची संस्कृती, वारली पेंटीग आणि त्यांचे प्रसिध्द तारपानृत्य पहाता येईल.

➢ **सह्याद्री फेस्टीव्हल :-** सह्याद्री पर्वतातील जैववैविध्याची नोंद युनोस्कोच्या यादीत झाली आहे. वर्षाच्या १२ ही महिने सह्याद्री पर्वत हिरवगार असतो. या पर्वतराजीतील नैसर्गिक वनसंपदा पक्षी निरीक्षण, जंगल भ्रमंती, वन्य जीव पहाणे, त्याप्रमाणे ॲडव्हेंचर स्पोर्टससाठी आदर्श स्थळ आहे. यासाठी सह्याद्री फेस्टीव्हल.

➢ **पर्यटन प्रदर्शनात सहभाग :-** वर्ल्ड ट्रॅव्हल मार्ट, बर्लिन ट्रॅव्हल फेअर यांसारख्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होऊन कोकणात जगभरातून पर्यटक आणण्याची योजना आहे. याबरोबरच कोलकत्ता, बंगलोर, दिल्ली येथील राष्ट्रीय पर्यटन प्रदर्शनात सहभाग नोंदविला जाणार आहे.

➢ **हॉस्पिटॅलिटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट :-** कोकणातील तरुणांना हॉस्पिटॅलिटी व पर्यटन व्यावसायाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी हॉस्पिटॅलिटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट उभारण्याचे प्रस्तावित आहे. पर्यटन व्यवसायात मनुष्यबळ निर्माण करणे हा या इन्स्टिट्यूटचा उद्देश आहे. समृदध कोकण अभियानाअंतर्गत कोकणातील पर्यटन व्यावसायिक आणि व्यवस्थापक यांच्यासाठी दीड दिवसांचा फाऊंडेशन कोर्स आयोजित करण्यात येत आहे.

१) हॉटेल, रिसॉर्ट, होम स्टे यांमधील पायाभूत सूविधा आधुनिकीकरण ITDC / MTDC नियमाप्रमाणे सुविधांची रचना , पायाभूत सुविधा, विकासाच्या वेळी घ्यावयाची काळजी

## कोकण भूमी प्रतिष्ठानचे आगामी उपक्रम

२) आदर्श व्यवस्थापन ,पर्यटकांचे स्वागत, रिसेप्शन व्यवस्था संदर्भात स्टाफचे प्रशिक्षण, पर्यटकांबरोबर सुसंवाद, पर्यटकांनबरोबर नियमित सुसंवाद यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

३) हाऊस किपिंग - रुमची सजावट, नियमित देखभाल, टॉयलेट स्वच्छता , बेडशिट, पिलोकव्हरस यांची व्यवस्था

४)फेसबुक, टि्विटर , इन्स्टाग्राम, वेबसाईट यासारख्या सोशल मिडीयामार्फत मार्केटिंग करण्याचे तंत्र आणि त्याद्वारे व्यवसायवृदधी कशी करावी.

५) पर्यटकांना स्थानिक पातळीवर पर्यटनाचे विविध पर्याय, त्यासाठी विविध व्यवस्था, वाहतुकीचे पर्याय, आयटनरी तयार करणे इ...

६) हॉटेलचे ब्रँडीग करण्याचे मार्ग, मार्केटिंगचे विविध अंगे, ब्रँडींगचे फायदे इ.. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले हॉटेल नेण्यासाठी विविध कायदे , लायसन्सेस, प्रमाणके इ माहिती..

७) हॉटेल , रेस्टॉरंट, होम स्टे व्यवसायात महिलांचा आणि संपूर्ण कुटूंबाचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न

**प्रशिक्षण वर्ग :-** कोकणातील शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती न करता आधुनिक तंत्रज्ञानाच सहाय्य घेऊन शेती करावी. कमी जागेत अधिक उत्पादन घेऊन स्वतःची आर्थिक उन्नती साधावी. या उद्देशाने आधुनिक शेती प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. (१) हाय टेक शेती, फार्म मॅनेजमेंट, (२) हापूस आंबा लागवड (३) भाजीपाला प्रशिक्षण

➢ **मत्स्य प्रशिक्षण :-** प्रतिष्ठानच्या कार्यालयात मत्स्य प्रशिक्षणाचे दरमहा आयोजन करण्यात येते.

➢ **समृध्द कोकण मत्स्य शेती प्रशिक्षण केंद्र :-** वाढते प्रदूषण, बाजारपेठेतील वाढती मागणी आणि कमी होत असलेले मत्स्य उत्पादन त्याबरोबर कोकणला लाभलेला ७२० कि.मी. समुद्र व खाडी या भुभागाचा उपयोग मत्स्य शेती करण्यासाठी आदर्श आहे.

माञ मत्स्य शेती कशी करावी, याची माहिती व मार्गदर्शन मिळत नसल्याने महाराष्ट्र व पर्यायाने कोकण उत्पादनात कमी पडतो ही गरज ओळखून आपण मत्स्य संवर्धन विषयाचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करत आहोत. मात्र आता या पुढील पाऊल म्हणजे आपण वेंगुर्ला मोचेमाड येथे समृध्द कोकण मत्स्यशेती प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. या केंद्रामुळे आपल्याला प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन करणे शक्य होणार आहे. तलावातील खेकडा शेती प्रशिक्षण सर्वत्र होतेच मात्र इनहाऊस खेकडा शेती प्रशिक्षण हा कोकणातील, राज्यातील नाही तर व देशातील पहिला उपक्रम आहे. पुढील कालावधीत कोळंबी संवर्धन मत्स्यशेती, खेकडा संवर्धन शोभिवंत मासे आदी प्रशिक्षण सुरु करण्यात येत आहे.

➢ **जलसमृध्द कोकण अभियान :-** कोकण जलचेतना कार्यक्रमात गांधारी, जगबुडी, अर्जुना, जानवली नद्या दत्तक घेण्यात आल्या. या नद्यांवर पुनर्जीवन अभियान राबविण्यात येत आहे. या चारही नद्यांमधील गाळ काढणे, पात्राचे खोलीकरण आणि रुंदीकरण करणे, नदी किनारी बांध घालणे, आवश्यक त्या ठिकाणी बंधारे घालून पाणी अडविणे. या पाण्यावर आधुनिक सामुदायिक शेती करुन गाव समृध्द बनविणे. यासाठी जलसमृध्द कोकण अभियान राबविण्यात येत आहे. या कामासाठी नदीचा रोडमॅप तयार होत असून नदी पुनर्रचना कार्यक्रमासाठी, जिल्हा तालुका, गाव स्तरावर नदी समिती बनविण्यात येत आहे. या समितीच्या समन्वयातून नवीन कामांची रुपरेषा ठरविणे, नदीचे व्हिजन डॉक्युमेंट बनविणे, निधी संकलन करणे, ग्रामस्थांनी श्रमदान करणे ही कामे पुढील काळात करण्यात येणार आहेत. आपल्या गावातील नदीच्या पुनर्जीवनासाठी आणि गाव विकासासाठी त्या -त्या विषयांच्या विविध समित्या बनविण्यात आल्या आहेत. या समितीची कामे निश्चित करण्यात येत असून त्याप्रमाणे गावचा / नदीचा विकास करण्यात येणार आहे.

# जलसमृध्द कोकण अभियान














# जलसमृध्द कोकण अभियान




आंबवली गावातून वाहणारी जगबुडी नदी





बायाचा डोह - पोमेंडी गुहागर



अर्जुना नदीवरील बांधकाम चालू असताना



गांधारी नदी, रायगड


साखर नदी, खेड





## कोकण पर्यटन उद्योग संघ - कार्यकारिणी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **माधव भांडारी**<br>अध्यक्ष | **प्रभाकर सावे**<br>उपाध्यक्ष | **नरेश पेडणेकर**<br>उपाध्यक्ष | **प्रवीण मुळीक**<br>संचालक | **मिलिंद कांबळी**<br>संचालक |

## समृध्द कोकण - कार्यकारिणी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **नरेंद्र बामणे**<br>संचालक | **किरण खानोलकर**<br>संचालक | **शेखर कर्पे**<br>संचालक | **ओमकार गिरकर**<br>संचालक | **डॉ. विवेकानंद सावंत**<br>संचालक |
| **संदीप अध्यापक**<br>संचालक | **संदेश चिकणे**<br>संचालक | **ललित जाधव**<br>संचालक | **तानाजी मोरे**<br>संचालक | **विजय धामापूरकर**<br>संचालक |
| **वासुदेव तुळसणकर**<br>संचालक | **विजय चव्हाण**<br>संचालक | **भूषण सावे**<br>संचालक | **रवि परब**<br>संचालक | **मंगेश माळकर**<br>संचालक |
| **प्रविण पडयाळ**<br>संचालक | **ॲड. हर्षद साळवी**<br>संचालक | **मिनल ओक**<br>संचालक | **इफ्तिकार चरफरे**<br>संचालक | **भालचंद्र जाधव**<br>संचालक |
| | **संतोष नलावडे**<br>संचालक | | **विवेक देसाई**<br>संचालक | |

## तज्ज्ञ मार्गदर्शक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **गोविंद जोशी**<br>फळप्रक्रिया तज्ज्ञ | **डॉ. सुहास पेडणेकर**<br>प्रिंन्सिपल रुईया कॉलेज | **विजय जोगळेकर**<br>आंबा तज्ज्ञ | **कॅ. अरुण करकरे**<br>सागरी तज्ज्ञ | **डॉ. सुरेश नाईक**<br>मत्स्य तज्ज्ञ |
| **प्रकाश पाटील**<br>मत्स्य तज्ज्ञ | **सचिन कारेकर**<br>कृषी तज्ज्ञ | **डॉ. चंद्रकांत मोकल**<br>कृषी तज्ज्ञ | **धनंजय यादव**<br>फळप्रक्रिया तज्ज्ञ | **नंदकुमार मोघे**<br>मत्स्य तज्ज्ञ |
| | **विनय महाजन**<br>कृषी तज्ज्ञ | | **डॉ. राजेंद्र कोकणे**<br>पशुवैद्यकिय तज्ज्ञ | |

## कार्यकारिणी समिती सदस्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्चित कर्पे | जगजीवन कांबळे | शशिकांत तोरस्कर | हेमंत शिंदे | राम कोळवणकर |
| मकरंद केसरकर | अजय यादव | रमेश पाटील | मधुकर पराडकर | राघवेंद्र करंबेळकर |
| केदार शिंदे | अशोक उतेकर | कुमार धुरी | निलेश गावडे | स्वाती गावडे |
| प्रमोद शिंदे | सुचित्रा मोरे | प्रशांत कांबळे | दिनेश भट | डॉ. राजेश घांगुर्डे |
| उमेश दळवी | चंद्रकांत महाडिक | जयंत वर्तक | सुधाकर होलम | प्रमोद गिरकर |
| संजय नेवगे | अवधूत कडू | नितीन वेळणेकर | योगेश पडवळ | नितीन गावकर |
| कृष्णा कांबळी | किर्ती मयेकर | योगेश आंब्रे | समीर साळवी | प्रमोद केळकर |

KOKAN BHUMI PRATISHTHAN

समृध्द कोकण

GLOBAL KOKAN FESTIVAL
Art Culture Food Tourism & Trade

समृध्द कोकणासाठी !

KOKAN Green Life TOURISM

कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्था

www.kokanclub.org
www.globlakokan.org
www.kokangreenlife.org



-: कार्यालय ऑफिस :-

ऑफिस नं. २५-२६, अजय शॉपिंग सेंटर, टी.च.कटारिया मार्ग, माटुंगा रोड (प.), मुंबई - १६
फोन: ०२२-२४३२४२६० / २४१५५४१२ / २४१५५४१३